**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०५ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **'विकसित भारत जी राम जी' योजनेअंतर्गत राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या हस्ते वितरीत.**
2. **मुलांच्या जडण घडणीसाठी त्यांना आजी-आजोबांच्या सहवासात वाढविण्याची गरज असल्याचं सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचं प्रतिपादन.**
3. **विदर्भातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबूराव तिडके यांचं आज निधन; मान्यवरांकडून आदरांजली.**
4. **आज विदर्भातील अनेक जिल्ह्यांत अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट.**

**आता सविस्तर बातम्या …….**

जी राम जी

विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी दूरस्थ पद्धतीनं वितरित केला. केंद्र सरकारनं या योजनेतला आपला वाटा दिला असून राज्य सरकारांनीही आपापला वाटा वितरित करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

विकसित भारत रोजगार हमी आणि आजीविका मोहीम अर्थात VB-G RAM G कायदा १ जुलैपासून लागू झाला आहे. विकसित भारत या संकल्पनेला अधिक गती देण्याकरता या कायद्याअंतर्गत पुढच्या ५ वर्षांमध्ये देशातल्या २ लाख ८६ हजार ग्रामपंचायतींमध्ये साडेसात लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली जाणार आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

डॉ.मोहन भागवत

मुलांच्या नैसर्गिक मानसिक जडणघडणीसाठी त्यांना लहानपणापासून मोबाईलच्या आहारी न नेता आजी-आजोबांच्या सहवासात वाढविण्याची गरज असल्याचं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केलं. नागपूर इथं आयोजित ‘सन्मार्ग माइंड वेलनेस व्यसनमुक्ती

आणि पुनर्वसन केंद्रा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी पाश्चात्य मानसशास्त्रासोबतच पतंजली योगसूत्र, योगवासिष्ठ यांसारख्या भारतीय ज्ञानपरंपरेतील विचारांचा अभ्यास करून भारतीय संदर्भातील परिपूर्ण मानसशास्त्र विकसित करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

गोमाता संवाद यात्रा /मुख्यमंत्री

गोसंर्धन, गोसेवा आणि भारतीय संस्कृतीतील गोमातेचं अनन्यसाधारण महत्त्व जनमानसात रुजविण्याच्या उद्देशानं महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित करण्यात आलेल्या राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचा समारोप नागपुरातील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. गोशाळा हे गोशक्तीचं केंद्र झालं पाहिजे. ज्या माध्यमातून केवळ गायीचं संरक्षण संवर्धन नव्हे, तर तिथं संशोधन झालं पाहिजे, विविध उत्पादनांचा विकास झाला पाहिजे आणि त्यांचं ब्रण्डिंग झालं पाहिजे, असं फडणवीस यावेळी म्हणाले. ही उत्पादनं विविध ठिकाणी विकण्यासाठी नाममात्र दरात स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात येतील, असं आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिलं.

'एलएनजी' पुरवठा

पश्चिम आशियात लागू झालेल्या युद्धविरामानंतर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून 'एलएनजी' अर्थात, द्रवरूप नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत सुरू झाल्यानंतर एलएनजीच्या पुरवठ्यावरचे आपात्कालीन निर्बंध सरकारनं मागं घेतले आहेत. या वर्षीच्या मार्च महिन्यात हे निर्बंध लादले गेले होते.

बाल हक्क संरक्षण

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगानं राज्यातले सर्व जिल्हाधिकारी आणि बाल संरक्षण कक्षाच्या अध्यक्षांना जिल्ह्यांमधल्या बाल संरक्षण व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन १५ जुलैपर्यंत सविस्तर अहवाल सादर करायचे निर्देश दिले आहेत. हा अहवाल संबंधित विभागांकडून माहिती संकलित करून नाही, तर जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः पडताळणी करून वस्तुनिष्ठ स्वरूपात सादर करावा, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

## आषाढी वारी

आषाढी एकादशीच्या निमित्तानं संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलमय झाला आहे. संपूर्ण राज्यातून विठ्ठल भक्त पालखी घेऊन पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहेत. नागपुरात देखील पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखीचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीनं या पालखी सोहळ्याचं आणि वारकऱ्यांचं भव्य स्वागत करण्यात आलं. यावेळी तरुणांनी रस्त्यावर आकर्षक रांगोळ्या काढून आणि फुलांची उधळण करत वारकऱ्यांचं स्वागत केलं. दरम्यान, यवतमाळहून दिव्यांगांची वारी पंढरपूरकडे निघाली आहे. सेवा समर्पण प्रतिष्ठानचा हा उपक्रम असून वारीचं  हे तिसरं वर्ष आहे. पूर्णत: दिव्यांगांची पंढरपुरात जाणारी ही महाराष्ट्रातील पहिलीच वारी आहे. 22 दिवसांत 521 किमीचा पायी प्रवास करून दिव्यांग वारी पंढरपूर इथं पोहचणार आहे.

## वारी रिंगण

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ आणि संतश्रेष्ठ मुक्ताबाई यांच्या पालखी सोहळ्यात आज भक्तिमय वातावरणात रिंगण सोहळे पार पडले. नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नर तालुक्यात दातली इथं संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचं पहिलं गोल रिंगण उत्साहात झालं. ज्ञानोबा- तुकारामच्या जयघोषात सुमारे ३० ते ३५ हजार वारकरी यात सहभागी झाले.

## बाबुराव तिडके निधन

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबूराव तिडके यांचं आज निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना आदरांजली वाहिली. विदर्भाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातलं त्यांच्या योगदानाचं मुख्यमंत्र्यांनी स्मरण केलं. त्यांच्या निधनानं आपण विदर्भाच्या सार्वजनिक जीवनातलं एक उमदं, अभ्यासू आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आशीष जैस्वाल यांच्यासह इतरांनीही तिडके यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

## तीजन बाई

विख्यात पंडवानी गायिका आणि पद्मविभूषण तीजन बाई यांचं आज निधन झालं. त्या ७० वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक दिवसांपासून त्या आजारी होत्या आणि

त्यांच्यावर उपचार सुरू होते. आज पहाटे सव्वा तीनच्या सुमाराला त्यांची प्राणज्योत मालवली. ताकदीचा आवाज, रंगमंचावरचा आकर्षक वावर आणि सादरीकरणाच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीतून त्यांनी पंडवानी या छत्तीसगडच्या लोककलेला वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या अद्वितीय योगदानासाठी त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

पेरणी

मृग नक्षत्रात हुलकावणी दिलेल्या पावसानं सध्या दमदार हजेरी लावल्यामुळे अमरावती जिल्ह्यात रखडलेल्या खरीप पेरण्यांना मोठी गती आली आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीलाच समाधानकारक झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील एकूण ६ लाख ८२ हजार ९९२ हेक्टर क्षेत्रापैकी तब्बल ५० टक्के क्षेत्रावर  पेरण्या आटोपल्या आहेत.

आंदोलन

भंडारा शहरातील खांब तलाव इथं रस्ता फुटल्यानं नागरिकांना  कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग असल्यानं स्थानिक प्रशासनाचं त्याकडे दुर्लक्ष होत आहे, असा आरोप करत आज शिवसेना पक्षाच्या वतीनं रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. २४ तासांच्या आत रस्ता दुरुस्ती झाली नाही, तर आणखी तीव्र आंदोलन करणार असल्याचं आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

प्रजातींची नोंद

नागपूर विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील संशोधक मृदुल जाणे यांनी वर्धा जिल्ह्यातून ‘लेप्टोजेनिस हिस्टेरिका’, ‘पॉलीरक्रिस पंक्टिलाटा’ आणि ‘पॉलीरक्रिस टिबियालिस’ या तीन अत्यंत दुर्मिळ मुंगी प्रजातींचा शोध लावला आहे. महाराष्ट्रातून या  प्रजातींची नोंद होण्याची ही पहिलीच वेळ आहे.  वर्धा जिल्ह्यातील मुंग्यांच्या विविधतेवर सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनादरम्यान या दुर्मिळ प्रजातींचे नमुने संकलित करण्यात आले आहेत.

काटेपूर्णा जलसाठा

अकोला जिल्हयात मान्सून दाखल होऊनही अपेक्षित असा दमदार आणि सर्वदूर पाऊस होत नसल्यामुळे प्रमुख सिंचन प्रकल्पांमधील जलसाठा समाधानकारक पातळीवर पोहोचलेला नाही. अकोला शहराची जीवन वाहिनी मानल्या जाणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात सध्या केवळ १९.२४ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. अकोला पाटबंधारे विभागानं काल प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, काटेपूर्णा प्रकल्पाची पाणीपातळी ३४०. ८० मीटर असून, त्यात १६. ६२२ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा आहे. जिल्हयातील प्रमुख प्रकल्पांपैकी मोर्णा प्रकल्प सर्वाधिक ४३.३० टक्के भरला असून, त्यामध्ये १७.९५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आहे.

हवामान

विदर्भात मागील 24 तासात गोंदिया जिल्हयातील सालेकसा इथं सर्वाधिक 120 मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली. आज देखील भंडारा आणि गोंदिया जिल्हयात अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. नागपूर, यवतमाळ, अमरावती आणि वाशिम इथं देखील अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. उद्या  वर्धा, अमरावती आणि वाशिम वगळता अनेक ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यात दोन दिवस मुसळधार पाऊस पडल्यानं लाहेरी-बिनागुंडा मार्गावरील गुंडेनूर नाल्याला पूर आला असून गुंडेनूर, पेरमलभट्टी, पुंगासूर, तुर्रेमरका, दामनमर्का इत्यादी गावांचा संपर्क तुटला आहे. १ जुलैपासून आतापर्यंत भामरागड तालुक्यात १९०.६ दशांश मिलिमीटर पाऊस पडला आहे. आज गडचिरोलीसह जिल्हयाच्या अनेक भागांत रिमझिम पाऊस सुरू आहे.

क्रिकेट-रोहित राठोड

गोंडवाना विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या मॉडेल कॉलेजमधील बी.बी.ए. शाखेचा विद्यार्थी रोहित राठोड याची इंग्लंड इथं होणाऱ्या काउंटी क्लब क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रोहित भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करणार असून त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक जोशी यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचं प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणं ही अभिमानाची बाब असून त्यानं उत्कृष्ट

कामगिरी करून महाविद्यालय आणि देशाचं नाव उज्ज्वल करावं, अशा शुभेच्छा गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे यांनी दिल्या आहेत.

फिफा

फिफा विश्वचषक स्पर्धेत फ्रान्सने पॅराग्वेवर १-० असा विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत फ्रान्सचा सामना मोरोक्कोशी होईल. राउंड ऑफ थर्टी टू मधल्या शेवटच्या सामन्यात काल अर्जेंटिनाने काबो वेरदे वर, तर कोलंबियाने घानावर विजय मिळवून राउंड ऑफ सिक्सटीन मध्ये प्रवेश केला.

****